मराठवाडयातील शेतकऱ्यांचा इतिहास व सिद्यस्थिती

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या मानव्य
विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी पदवीसाठी सादर
केलेला संशोधन आराखडा.

: संशोधक :

चव्हाण देविदास गोविंदराव

(एम.ए.बी.एड्. इतिहास सेट)

:मार्गदर्शक:

प्रोफेसर डॉ. यु. एस. सांवत

एम.ए.बी.एड्.एम.फील.पीएच.डी

विभाग प्रमुख, पदव्युत्तर इतिहास व

संशोधन विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड

जून २०१९

प्रस्तावना :

भारत हा जगातील विकसनशील देश म्हणुन ओळखला जातो. भारताची अर्थव्यवस्था ही कृषीवर आधारित आहे. कृषी प्रधान म्हणुन भारताची ओळख आहे. मानवी जीवनाला स्थैर्य होण्यासाठी शेती हाच महत्वाचा घटक मानला जातो. शेतीचा शोध मध्याश्म युगाच्या (Mesolithic age) ही उत्तरार्धात लागला. नवाश्म युगात नांगराद्वारे शेती करण्याचे तंत्र मानवाने अवगत केले. शेतीसाठी उपयुक्त अवजाराची निर्मिती या मानवाने केली. शेतीच्या शोधामुळे मानव हा शेतीमध्ये विविध प्रकारचे धान्य घेऊ लागला. शेतीत पिकलेली धान्य साठवून ठेवू लागला व गरजेनुसार त्यांचा वापर करू लागला शेतीमुळेच गावात समुहाने राहण्यासाठी सुरूवात झाली. सुमारे ५००० वर्षापूर्वी जगातील प्रमुख चार नद्याच्या काठी मानवी संस्कृती निर्माण झाली.

तेग्रीस युफ्रेटीस नद्याच्या काठी मेसोपोटेमीया संस्कृती, नाईल नदीच्या काठी इजिप्सीयन संस्कृती, सिंधु नदीच्या काठी सिंधु संस्कृती व हो-न्हॅग-हो नदीच्या काठी चिनी संस्कृती उदयाला आली वस्तुच्या देवाण घेवाणीसाठी ग्रामीण समुदायात राहणारा मुनष्य मोठया संख्येने एकत्र येऊन राहु लागला. त्यांच्या स्थायी स्वरूपाच्या वास्तव्यातून खेडी निर्माण झाली.

भारतातील पर्जन्यमान समशितोष्ण कटीबंधात मोडतो. भारतामध्ये तीन ऋतु पडतात. उन्हाळा, पावसाळा व हिवाळा प्रत्येक ऋतुचा कालावधी चार चार महिन्याचा असतो. याला कारणीभूत हिमालय पर्वत आहे. भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे येथील शेतीवर जवळपास ८५ टक्के लोक अवलंबून आहे. या देशात प्रचंड लोकसंख्या असल्यामुळे त्याचबरोबर प्रचंड बेकारी, दैववादी जनता, अंधश्रध्दा, गरिबी, भ्रष्टाचार, रोजगाराच्या संधी अल्प प्रमाणात, योग्य बि-बियानाचा अभाव, दुष्काळ, निसर्गाचा लहरीपणा इत्यादी कारणामुळे शेतीची उत्पादन क्षमता कमी झाली. शेतीची तुकडयात विभागणी झाली. त्यामुळे शेती कसण्यासाठी अपुरी पडु लागली. कुटूंबातील राबणाऱ्याची संख्या जास्त व शेती कमी असल्यामुळे उत्पादन घटले. त्याचा परिणाम शेतकऱ्यांवर होऊ लागला. कुटूंबाचे पालन पोषण, आजार, विवाह इत्यादीची जबाबदाऱ्या त्यांच्यावर येऊन पडली. त्यामुळे शेतकऱ्यांना खाजगी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. भारत देशात महाराष्ट्र हे प्रगत राज्य असले तरी प्रादेशिक असंतुलन एक गंभीर समस्या आहे.

महाराष्ट्रामध्ये कोकण, विदर्भ व मराठवाडा असे प्रादेशिक विभाग आहेत. या विभागात कोकण हा पुढारलेला प्रादेशिक विभाग आहे. त्यांच्या मानाने विदर्भ व मराठवाडा अतीशय मागासलेला आहे.

मराठवाडयातील शेतीच्या मागासलेपणाची कारणे अशी की, शेती व्यवसायाच्या विकासाला आवश्यक अशा मूलभूत सुविधा येथे कमी आहेत. उदा. जलसिंचन, वाहतूक, दळण—वळण, शेती संशोधन इ. सर्वात मोठी उणीव पतपुरवठयाची आहे. कारण मराठवाडयातील सहकारी चळवळ क्षीण आहे व व्यापारी बॅंकाच्या सोयी अपुरे आहेत. मराठवाडयातील सामाजिक मागासलेपणाही, साक्षरता कमी, विशेषत: स्त्रियांची साक्षरता फारच कमी, शिक्षण कमी व त्याची गुणवत्ता फारच कमी तंत्रशिक्षणाच्या व व्यावसायीक कुशलता वाढविणाऱ्या सुविधा कमी, आरोग्यासाठीच्या सोयी कमी, कुपोषण अधिक, सहकारी संस्था क्षीण, स्वंयसेवी संस्थाचा अभाव इ. त्याचबरोबर शेतीला पुरक व्यवसायाचाही अभाव असल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती नाजुक बनत चालली आहे. उदा. मत्स्य व्यवसाय, कुकुटपालन, पशुसंवर्धन, फळबागायती, दुग्ध व्यवसाय, इत्यादीची मराठवाडयात खुप क्षमता असूनही ते सर्व व्यवसाय प्राथमिक अवस्थेत आहेत.

मराठवाडा हा महाराष्ट्रातील एक महत्वपुर्ण असा प्रादेशिक विभाग आहे. मराठवाडा, विदर्भ व कोकण या प्रादेशिक विभागांचे मागासलेपण आणि विकासातील विभागीय असमतोल यामुळे या भागात गेल्या ७० वर्षापासुन आर्थिक, राजकीय व सामाजिक विचार केला असता. मराठवाडा हा विभाग कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेला प्रदेश आहे. मराठवाडयात एकूण भूमीपैकी ५६.८ लाख हेक्टर क्षेत्र हे लागवडीखाली असून एकूण लोकसंख्येच्या साधारणत: ८० ते ८५ टक्के लोकसंख्या शेती व शेतीपुरक व्यवसायावर अवलंबून आहे. इतर प्रादेशिक विभागाचा विचार करता मराठवाडयात पश्चिम महाराष्ट्रासारखे उद्योगाचे जाळे नाहीत. कोकणासारखे मत्स्यव्यवसाय व तत्सम उद्योग, किनारपटटी सारखी विकासाची नैसर्गिक साधने नाहीत. या तुलनेत मराठवाडा नेहमींच मागासलेला राहीलेला आहे.

राजकीय दृष्टीने विचार केला असता मराठवाडा ६०० ते ७०० वर्षे मुसलमानी सरंजामशाहीच्या वर्चस्वाखाली राहिलेला आहे. इ.स. १७२४ पासून मराठवाडा इतर ब्रिटीश स्वरूपाच्या संरजामी निझाम राजवटीखाली राहिलेला आहे. त्यामुळे मराठवाडयाचा इतर ब्रिटीश

अमंलाखालील प्रदेशाच्या तुलनेत, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागासलेलाच राहीलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही स्वतंत्र हैद्राबाद राज्य, द्वैभाषीक मुंबई प्रांत, संयुक्त महाराष्ट्र चळवळ या सारख्या राजकीय स्थितंतराच्या काळातही मराठवाडयाच्या वाटयाला पोकळ अश्वासनाशिवाय काहीही लाभले नाही.

मराठवाडा कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेला प्रदेश असल्यामुळे मराठवाडयाच्या आर्थिक विकासाची मुख्य भिस्त ही शेती विकासावरच अवलंबून राहिलेली आहे. परंतु दुर्भाग्याने मराठवाडयातील नैसर्गिक आपत्ती, संतुलित पावसाचा अभाव, जलसिंचन सुविधांची कमतरता शिवाय अज्ञान, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, वित्त पुरवठयांचा अभाव इत्यादी कारणामुळे मराठवाडयातील शेतीचा म्हणावा तितका विकास झालेला नाही. परिणामी येथील शेतकरी कधी निसर्गाच्या तर कधी कर्जाच्या डोंगराखाली पिचला गेलेला आहे. अज्ञान व नैराश्यातून त्याच्या समोर आत्महत्या करण्याशिवाय कोणताही पर्याय उरलेला नाही. म्हणुन मराठवाडयात आतापर्यंत हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून आल्या. अलीकडच्या काळात आत्महत्येचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

१९९१ च्या नव्या आर्थिक धोरणानुसार भारताने जागतिकीकरण व उदारीकरणाचा स्विकार करून मुक्त अर्थव्यवस्थेचे धारेण स्विकारलेल आहे. मराठवाडयात शेतकऱ्यांसाठी विकासाचे एक नवे दालन निर्माण करून देण्यात आले. आयात निर्यातीत वाढ करून शेतकऱ्यांसाठी आंतरराष्ट्रीय बाजरपेठ खुली करून दिली. परंतु इतर विकसीत राष्ट्रांनी शेतीला दिलेल्या भरगच्च अश्वासनामुळे त्याचाही म्हणावा तेवढा फायदा भारतीय शेतकऱ्यांना झाला नाही. अशा प्रंसगी आपली शेती ही एक जिवनपध्दती आहे. ही मानसिकता बदलून शेती ही उद्योग व्यवसाय बनवणे व त्यानुसार शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवणे ही काळाची गरज आहे.

वरील पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणा लक्षात घेता जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजावर आत्महत्येची वेळ का येते? हा आजचा ज्वलंत प्रश्न आहे. या माध्यमातून मराठवाडयातील शेतकऱ्यांची सद्यस्थिती जाणून त्यासंदर्भात शासकीय पातळीवर कोणत्या योजना, प्रकल्प, राबविणे आवश्यक आहे. याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणुन हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन पूर्व साहित्याचा आढावा

मराठवाडयातील शेतकऱ्यांचा इतिहास व सद्यस्थिती हा संशोधनासाठी विषय निवडण्यात आला आहे. प्रस्तुत विषय निवडण्यापुर्वी मराठवाडा या प्रांतातील शेतकऱ्यांच्या संदर्भात कोणत्याही स्वरूपाचे संशोधन झालेले नाहीत. मराठवाडयातील शेतकरी त्यांची सद्यस्थिती या विषयावर यापूर्वी साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक, दैनिक वर्तमान पत्रातून मान्यवर मंडळीचे लेख कमी अधिक प्रमाणात प्रकाशित झालेले आहेत. प्रस्तुत विषयावर संदर्भग्रंथ म्हणुन नगन्यपूर्ण लिखान झालेले आहेत. उदा. स. मा. गर्गे सारख्या विध्वानांनी या विषयावर संपादकीय स्वरूपात मराठवाडयाचा विकास आणि गती” हा ग्रंथ प्रकाशित केला अशा प्रकारचा दुसरा ग्रंथ माझ्या नजरेस पडला नाही. डॉ. भगवान काळे यांनी मराठवाडा काल आणि आज तसेच भुजंगराव कुलकर्णी यांनी मराठवाडा २००१ असे दोन उत्कृष्ट ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत. शिवाय प्रस्तुत विषयाशी साम्य असलेले अनेक पीएच.डी ग्रंथात केवळ प्रस्तावनेच्या स्वरूपात माहिती दिलेली आहे.हे सर्व अपूर्ण लिखान व संशोधनाचा अभाव यामध्ये दिसून येतो.

संशोधनाचे महत्व

जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जाणारा बळीराजा शेतकरी आज कोणत्या परिस्थितीत आहे. त्याची काय अवस्था आहे. आमची अर्थव्यवस्था ही कृषी वर आधारित आहे. तरीपण शेतकरी सुखी आहे का ? हा ज्वलंत प्रश्न आहे. भारत देश हा विकसनशील देश म्हणुन ओळखला जातो. त्यात महाराष्ट्र चांगल्या स्थितीमध्ये असल्याचे म्हटले जाते. परंतु महाराष्ट्रातील मराठवाडा हा एक मागास प्रांत आहे. या भागात औद्योगिक दृष्टया मागासलेपण आढळून येते. या भूभागावर प्रचंड लोकसंख्या (वस्ती) आहे व मुख्य व्यवसाय शेती, या भागात प्रचंड बेकारी असल्यामुळे शेतीवर ताण पडतो. त्याच बरोबर हा भाग सतत दुष्काळाच्या छायेत आहे. येथील शेती कोरडवाहू व पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती लागवडीसाठी प्रचंड खर्च येतो. ते खर्च करण्याची कुवत शेतकऱ्यात नसल्यामुळे खाजगी सावकाराकडून व बॅंकाकडून कर्ज घेतला जातो. सततच्या नापिकीमुळे व निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांची

आवस्था फार बिकट झालेली दिसून येते. बळीराजा संकटात सापडला आहे. त्यांना मदतीची गरज आहे. तो अज्ञानी आहे. तो पारंपारिक पध्दतीने शेती करतो त्यामुळे उत्पादन जेवढे हवे तेवढे मिळत नाही. शेती ही आधुनिक पध्दतीने करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी लागणारी साधने ही अत्यंत खर्चिक असल्यामुळे शेतकरी भरडत चालला आहे. त्यांना आज मदतीची खऱ्या अर्थाने गरज आहे. मी ही शेतकऱ्यांचा मुलगा आहे. शेतकऱ्यांच्या काय समस्या आहेत. हे अत्यंत जवळून पाहतोय, त्यासाठी मराठवाडयातील शेती, शेतकरी व त्यांच्या समस्या यांचा चिकित्सक दृष्टीने अभ्याय करणे अत्यंत महत्वाचे आहे. म्हणुन मराठवाडयातील शेतकऱ्यांचा इतिहास व सद्यस्थिती हा प्रबंध इतिहास विषयातील राजकीय, सामाजिक विभागासाठी अत्यंत मोलाचा ठरणार आहे. मराठवाडयातील शेती व शेतकरी यासाठी उपक्रम व कृती आराखडे महाराष्ट्र व भारत सरकारला मार्गदर्शक ठरणार आहे. मराठवाडयातील शेतकऱ्यांचा सखोल अभ्यास करून शेतकऱ्यांच्या मुलाखती घेण्यात येईल. या संशोधनात मराठवाडयातील आठ जिल्हयांचा समावेश होणार आहे. त्यात नांदेड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद, बीड इ. जिल्हयाचा आढावा घेतला जाईल. हे संशोधन पुढच्या पिढीस प्रेरणादायी ठरणार आहे व हे संशोधन सामाजिक दृष्टया हिताचे ठरणार आहे. शिवाय शेतकऱ्यांना दिशा दर्शक ठरणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टये

१. मराठवाडयातील ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.
२. मराठवाडयातील मृदेचे अध्ययन करून त्याच्या स्थितीचा आढावा घेणे.
३. मराठवाडयातील शेतीचे प्रकार त्याची स्थिती व त्यावरील आधुनिक तंत्रज्ञान यांचा अध्ययन करणे.
४. मराठवाडयातील शेतकऱ्यांची कौटूंबिक स्थितीचे अध्ययन करणे.
५. मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या समस्याचा सखोल अध्ययन करणे.
६. मराठवाडयातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कशा स्वरूपाची आहे यांचा अध्ययन करणे.
७. मराठवाडयातील शेती व शेतकरी यांचा संबंध उदारीकरण व जागतिकीकरण यांचा अध्ययन करणे.
८. मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची माहिती संकलित करून त्यांचा आढावा घेणे.

९. मराठवाडयातील शेतकरी व त्यांची आर्थिक कुचंबना व आत्महत्येच्या कारणाचा अभ्यास करून निष्कर्ष काढणे.

गृहितके

१) मराठवाडयातील शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जाज वाढतो व कर्ज मुलांवर ठेवून मरतो.

२) मराठवाडयातील सिंचन व्यवस्थेचा अभाव.

३) मराठवाडयातील शेतकऱ्यांचा पारंपारिक शेती व्यवसाय.

४) मराठवाडयातील शेतकरी अंधश्रध्देवर विश्वास ठेवतो.

५) मराठवाडयातील शेती पुर्णत: निसर्गावर अवलंबून आहे.

६) सामुहिक शेतीचा अभाव

७) शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या बॅकाचा अभाव

८) मराठवाडयातील शेतीची उत्पादकता कमी आहे.

९) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अल्पप्रमाणात होतो.

१०) शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळत नाही.

११) मराठवाडयातील भुजल पातळी वरचेवर कमी होत आहे.

१२) शासकीय बाजारपेठांचा अभाव.

१३) खाजगी सावकाराकडून शेतकऱ्यांची पिळवणूक.

संशोधक पध्दती

मराठवाडयातील शेतकऱ्यांचा इतिहास व सद्यस्थिती हा कालखंड स्वांतत्र्योत्तर काळातील आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ज्या ऐतिहासिक संशोधन पध्दती आहेत. त्यापैकी सर्वेक्षण पध्दत,

मुलाखत संशोधन पध्दत व संदर्भ संशोधन पध्दतीचा (विश्लेषण पध्दतीचा) वापर करण्यात येणार आहे.

प्रस्तुत विषय सद्यस्थितीशी (वर्तमान काळाशी निगडीत) असल्यामुळे संशोधनात पारदर्शकता व सखोल व विस्तारित व्हावे व शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फुटेल व संशोधन वस्तुनिष्ठ पध्दतीने करण्यासाठी मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबाची मुलाखत घेतली जाईल.

नमुना निवड

प्रस्तुत संशोधन कार्यात मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयाला व प्रत्येक तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन एकूण आत्महत्येच्या प्रमाणात सहेतू नमुना निवड पध्दतीने एकूण ४०० शेतकऱ्यांची नमुना म्हणुन निवड केली जाईल. अध्ययन क्षेत्र जरी मर्यादित असले तरी अभ्यास सर्व समावेशक स्वरूपाचा असेल.

संशोधनाची व्याप्ती

इतिहास विषयातील कोणत्याही संशोधनासाठी स्थळांची आणि काळाची मर्यादा अत्यंत आवश्यक असते. मी माझ्या प्रबंधनाच्या संशोधनासाठी स्थळ मर्यादा म्हणुन मराठवाडा प्रांत निवडलेले आहे.

संशोधन आराखडा

प्रकरण योजना

१. मराठवाडयातील ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी
२. मराठवाडयातील शेतीचे स्वरूप
३. मराठवाडयातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती
४. मराठवाडयातील शेतकऱ्यांसमोरील समस्या
५. मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे जीवन
६. उदारिकरण, जागतिकीकरण व मराठवाडयातील शेतकरी
७. निष्कर्ष

प्रकरण योजना

प्रकरण पहिले : १) मराठवाडयातील ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

प्राचीन मराठवाडा, मध्ययुगीन मराठवाडा व आधुनिक मराठवाडा या तिन्ही कालखंडातील शेती विषयक माहिती राजकीय, भौगोलिक व सामाजिक या घटकावर संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात येईल.

भौगोलिक :

प्रस्तुत प्रकरणात मराठवाडयातील प्राकृतिक रचना, क्षेत्रफळ, नद्या, जलसिंचन प्रकल्प, हवामान, मृदेचे प्रकार, जमिनीचे प्रकार, लोकसंख्या, शेतकरी, पर्वतरांगा, शेतीवर अवलंबून असलेले शेतकरी इत्यादीची सविस्तर माहिती प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे : मराठवाडयातील शेतीचे स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात मराठवाडयातील शेतीचे प्रकार — बागायती, जिरायती, (कोरडवाहु) अनुत्पादक जमीन, जंगल व्याप्त जमिन, पारंपारिक शेती व आधुनिक शेती, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतकऱ्यांची कुटूंब पध्दत, सिंचन व्यवस्था (टिबक, तुषार सिंचन) कालवे, विहीरी, कॅनल, बोअरवेल (उपसिंचन) या सर्व बाबींचा या घटकात ऐतिहासिक संशोधनात्मक पध्दतीने प्रकाश टाकण्यात यईल.

प्रकरण तिसरे : मराठवाडयातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती

प्रस्तुत प्रकरणात मराठवाडयातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल. शेतकऱ्यांची वर्गवारी (श्रीमंत, गरीब, भूमिहिन, शेतमजूर इ. शेतकरी) कर्जबाजारीपणा, शेती उत्पादकता, अनुत्पादकता, केंद्र शासनाच्या शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजना व फलित, राज्य सरकार मार्फत शेतकऱ्यासांठीच्या विविध योजना व फलित या सर्व घटकांवर ऐतिहासिक संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण चौथे : मराठवाडयातील शेतकऱ्यांसमोरील समस्या

प्रस्तुत प्रकरणात मराठवाडयातील शेतकऱ्यांसमोरील समस्यांचा आढावा घेण्यात येईल. नैसर्गिक आपत्ती, अल्प उत्पादकता, अल्पभुधारकता, सिंचनाचा आभाव, योग्य बाजारपेठाचा आभाव, शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभावाचा अभाव, वाहतुक व दळणवळणाची अपुरी साधने, बाजारपेठांचा अभाव, शितगृहाचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावरील मर्यादा, अप्रशिक्षित शेतकरी, शेतकऱ्यांचे अज्ञान व अंधश्रध्दा, वित्तपुरवठयांचा अभाव या घटकावर ऐतिहासिक संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण पाचवे : मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे जीवन

प्रस्तुत प्रकरणात मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे जीवन यांचा आढावा घेण्यात येईल. जिल्हानिहाय आत्मत्याग्रस्त शेतकरी (पुरूष आत्महत्या व स्त्रि आत्महत्या) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची पार्श्वभूमी प्रस्तूत प्रकरणात मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुंटूबांची मुलाखत व सर्वेक्षण पध्दतीने प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण सहावे : उदारीकरण, जागतिकीकरण व मराठवाडयातील शेतकरी

प्रस्तुत प्रकरणात उदारीकरण, जागतिकीकरण व मराठवाडयातील शेतकरी यांचा आढावा घेण्यात येईल. नवे आर्थिक धोरण, जागतिकीकरण व शेती, जागतिकीकरणाचा शेतकऱ्यांवरील परिणाम. प्रस्तुत प्रकरणात उदारीकरण, जागतिकीकरण यांचा मराठवाडयातील शेतकऱ्यांवर काय परिणाम झाला यांचा आढावा ऐतिहासिक संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारशी

संपूर्ण संशोधनानंतर प्रस्तुत सशोधंनाचे निष्कर्ष निघतील त्याचा उहापोह सदरील प्रकरणामध्ये करण्यात येईल. संशोधनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि संशोधनाच्या नवीन दिशा निर्देशित करण्यासाठी महत्त्वाच्या शिफारशी ही करण्यात येतील.

वरील संशोधन आराखडयात संशोधन कार्य करते वेळेस संशोधन साधनाचा व संशोधन पध्दतीचा उपलब्धतेनुसार गरज पडल्यास संभाव्य बद्दल केले जातील.

संदर्भ सूची :

१) य. दि. फडके— विसाव्या शतकातील महाराष्ट्र मौज प्रकाशन

२) भुजंग कुलकर्णी — मराठवाडा २००१ बी. आर पब्लिकेशन कॉ. नवी दिल्ली १९८०

३) डॉ. भगवान काळे — मराठवाडा काल आणि आज, सकेंत प्रकाशन, जालना १९८८

४) महाराष्ट्र गॅझेटिअर (महाराष्ट्र शासन प्रकाशित)

५) नांदेड जिल्हा गॅझेटिअर

६) लातूर जिल्हा गॅझेटिअर

७) उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर

८) बीड जिल्हा गॅझेटिअर

९) औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर

१०) जालना जिल्हा गॅझेटिअर

११) परभणी जिल्हा गॅझेटिअर

१२) हिंगोली जिल्हा गॅझेटिअर

१३) डॉ. सुधीर भोंगळे — शेती इस्त्राईलची, राजहंस प्रकाशन

१४) ॲग्रोवन कृषी ज्ञानमाला— पाणीदार गावे, सकाळ प्रकाशन

१५) संपादक स. मा. गर्गे — मराठवाडयाचा विकास दिशा आणि गती

१६) किर मालसे — महात्मा फुले समग्र वाङमय

१७) प्रा. कुलकर्णी मीना — श्री शाहु छत्रपतीचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन कोल्हापूर

१८) डॉ. संगवे विलास (संपादकीय) — राजर्षी शाहु छत्रपती पेपर्स खंड — ५ (१९०६—१९०९)

१९) करवीर सरकारचे मुलकी वटहूकूम— खंड १ व २ (१९३६)

२०) सपांदक डॉ. पवार जयसिंगराव व निवडक विजयी मराठवाडा, मराठा प्रकाशन कोल्हापूर

२१) डॉ. वाळींबे रा. श. — १९ व्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना १९६२

२२) नरेंद्र जाधव— लसावी माझ्या समग्र अभिव्यक्तीचा— ग्रंथाली प्रकाशन जुलै २०१३

२३) अधिकारी चंद्रकांत — खोती विरूध्दाचा लढा, मानगाव, रायगड, प्रकाशन जुलै १९९९

२४) सुखदेव थोरात— डॉ. बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल, विद्युत विकास भूमिका व योगदान— सुगावा प्रकाशन पुणे २००५.

२५) Dr. V.B. Ghuge, Rajarshi Shahu a model rular. - kirti pub Aurangabad 1994.

२६) Maharashtra State Gazetteer of India

२७) The report and writings in Maratha vijay

२८) चव्हाण रविकुमार— छत्रपती शाहुचे जलधोरण रयत सागर (संपादक. डॉ. सर्जेराव जिगे) त्रैमासिक ऑक्टो/नोव्हे/डिसे/२००६, पृष्ठ ०५.

संशोधक

चव्हाण देविदास गोविंदराव

(एम.ए.बी.एड्.इतिहास सेट)

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

मार्गदर्शक

प्रोफेसर डॉ. यु. एस. सावंत

एम.ए.बी.एड्.एम.फील.पीएच.डी

विभाग प्रमुख, पदव्युत्तर इतिहास व

संशोधन विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड.